**<u>फौजदारी चौकशी अर्ज क्र.५०/२०२५ चे</u>**

**<u>निशाणी क्र.०८ खालील आदेश</u>**

**(CNR-MHNS160001182025)**

०१. प्रस्तुतचा अर्ज वडनेरभैरव पोलीस ठाणे मधील गु.र.क्र. ३५४/२०२४ मधील विवो कंपनीचा टी.२ एक्स, ४जीबी + १२८ जीबी, त्याचा आयएमइआय क्र. ८६५२१००६३९४६०३१ व आयएमइआय क्र. ८६५२१००६३९४६०२३ एस क्र. १०बीडी९डी३३२एल०००सीपी असा व त्यामध्ये एअरटेल कंपनीचे सिम नं. ९९६०८६४०२२ मोबाईलचा अंतरीम ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अभियोगपक्षाने अर्जास विरोध करुन अर्ज नामंजूर होण्यास विनंती केली आहे. तसेच, तपासी अंमलदार यांनी पुढील योग्य तो आदेश होण्यास विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाबाचे सुक्ष्म वाचन केले. संचिकेचे अवलोकन केले असता, अर्जदाराने त्याच्या मागणीच्या पुष्ठयर्थ दप्तरी मोबाईलच्या खरेदीची पावतीची साक्षांकीत प्रत, प्रथम खबर अहवालाची छायांकीत प्रत व आधार कार्डाची छायांकीत प्रत सादर केलेली आहे. अर्जदाराच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पृष्ठयर्थ **<u>सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य</u>,** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. अभिलेखावर दाखल मोबाईल खरेदीची पावती यावरुन अर्जदार जप्त मोबाईलचा मालक असल्याचे दिसून येते.

०४. वरील बाब व मोबाईल खरेदीची पावती यावरुन अर्जदार जप्त मोबाईलचा मालक असल्याचे दिसून येते. खटल्याचा निकाल लागण्यास निश्चितच अवधी लागणार असल्याने जप्त मोबाईल पोलीस ठाण्यात पडून

निरुपयोगी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता, अर्ज मंजूर करणे विधीसंगत वाटते. त्याअनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यांत येतो.

२. ठाणे अंमलदार, वडनेर भैरव पोलीस ठाणे, ता.चांदवड, जि.नाशिक यांना आदेशीत करण्यात येते की, गु.र.क्र. ३५४/२०२४, **महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधीनियम, १८८७ चे कलम १२–अ अन्वये** मधील जप्त विवो कंपनीचा टी.२ एक्स ४जीबी + १२८ जीबी त्याचा आयएमइआय क्र.८६५२१००६३९४६०३१ व आयएमइआय नं. ८६५२१००६३९४६०२३ एस नं. १०बीडी९डी३३२एल०००सीपी असा एअरटेल कंपनीचे सिम नं. ९९६०८६४०२२ मोबाईलचा अंतरीम ताबा अर्जदार– राकेश आनंद पुरकर यांना रुपये ३०,०००/– च्या बंधपत्रावर खालील अटींवर देण्यात यावा.

अ) अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेचे अभिरक्षण करावे व आदेशीत केल्यानंतर मालमत्ता न्यायालयात हजर करावी.

ब) तपासी अंमलदारांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी जप्त मोबाईलचे रंगीत छायाचित्रे, अंतरीम ताबा अर्जदारास देण्यापुर्वी काढावे.

क) तपासी अंमलदारांना आदेशीत करण्यात येते की,

अर्जदाराने दिलेले बंधपत्र व छायाचित्रे अंतीम अहवालात न चुकता  सामील करावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.08.25 17:57:57 +0530

(वृषाली दी. सुंगारे)

ठिकाण – चांदवड                सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,

दिनांक – १८.०७.२०२५.                चादंवड.